आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २९५ वा ● बुधवार दि. ३० एप्रिल २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्स संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेची नियमावली तयार करण्यासाठी चार सदस्यीय समिती स्थापन करावी – उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई :– स्काऊट गाईड ही एक चळवळ आहे. महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्स ही संस्था राज्यात विशेषतः ग्रामीण भागात शालेय विद्यार्थी, युवक – युवतींमध्ये नेतृत्व, समाजसेवा, पर्यावरण संरक्षण आणि नैतिक मूल्यांचा विकास घडवण्याचं काम करत आहे. लोकशाही प्रक्रियेनुसार या संस्थेची निवडणूक होणे आवश्यक आहे. त्या पार्श्र्वभूमीवर स्काउट्स आणि गाईड्सचे राज्य मंडळ, जिल्हा मंडळ यांची निवडणूक प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने नियमावली तयार करण्यासाठी चार सदस्यीय समितीची स्थापना करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्स या संस्थेची निवडणूक घेण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, स्काउट्स आणि गाईड्स संस्थेची निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी नियमावली तयार करण्यासाठी नियुक्त



समितीने राज्य कार्यकारी मंडळाची स्थापना, युवा कार्यक्रम आणि प्रशिक्षणासंबंधी विविध कार्यक्रम, राज्यसंस्थेच्या पुढील वाटचालीसंबंधी,कामकाजासंदर्भात मार्गदर्शन करणे, जिल्हा समित्या नेमणे यासंदर्भात अहवाल सादर करावा. त्यानंतर राज्य संस्थेच्या उपविधीत बदल करण्यासाठी भारत स्काउट्स आणि गाईड्स राष्ट्रीय कार्यालय, नवी दिल्ली या संस्थेकडून मान्यता घ्यावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्स संस्थेच्या तत्कालीन उपविधीनुसार निवडणूक प्रक्रियेद्वारे अध्यक्ष आणि राज्य मुख्य आयुक्त यांची नियुक्ती होत होती. या निवडून आलेले पदाधिकाऱ्यांचा कालावधी पाच वर्षे होता. या पदाधिकाऱ्यांच्या कार्य कालावधीमध्ये नियमांचे पालन न करता सेवा प्रवेश नियमांमध्ये नियमबाह्य बदल करणे व इतर प्रशासकीय बाबतीतील गैरप्रकाराच्या तक्रारींबाबत चौकशी होऊन जुलै २०२० मध्ये राज्य मंडळ व राज्य कार्यकारी समिती या दोन्ही समित्या शासनाने बरखास्त केल्या होत्या.

या बैठकीस क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार विजयसिंह पंडित, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय,क्रीडा व युवक कल्याण आयुक्त हिरालाल सोनवणे, क्रीडा सहसंचालक सुधीर मोरे, भारत स्काउट्स आणि गाईड्स नवी दिल्लीचे राजकुमार कौशिक व महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्स संस्थेचे पदाधिकारी शोभना जाधव, आर.डी.वाघ, शरद दळवी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## वारणा व कडवी नदीतून बंदिस्त पाईपलाईनद्वारे शेतीसाठी पाणीपुरवठा करणेबाबत सर्वेक्षण करावे – जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील

मुंबई :– सांगली जिल्ह्यातील वाकुर्डे



उपसा योजनेच्या धर्तीवर खोची ता. हातकणंगले येथील वारणा नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यावरून शासकीय उपसा सिंचन योजना कार्यान्वित करून बंद पाईपलाईनच्या माध्यमातून शेतीसाठी पाणीपुरवठा करावे. तसेच कडवी नदीवर सावे (ता. शाहूवाडी) गावच्या हद्दीतून जुळेवाडी खिंडीत पाणी उपसाद्वारे उचलून बंदिस्त पाईपलाईनद्वारे लाभक्षेत्रातील गावातील सिंचनासाठी उपसा सिंचन योजना राबवण्याबाबत सर्व्हेक्षण करून याबाबतचा प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांनी दिल्या.

जलसंपदा मंत्री श्री. विखे–पाटील यांच्या दालनात बैठक झाली. यावेळी जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे, मुख्य अभियंता व सह सचिव प्रसाद नार्वेकर यांच्यासह संबधित अधिकारी उपस्थित होते. तर आमदार विनय कोरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, पाणी उपलब्धता लक्षात घेऊन या योजनांसाठी सविस्तर सर्वेक्षणाचे काम सुरू करावे. कृष्णा पाणी तंटा लवादाच्या मर्यादेत राहून पाणी उपलब्धतेनुसार नियोजन करावे. तसेच प्रकल्पातील पाणी उपलब्धतेनुसार लाभक्षेत्राचा सविस्तर अभ्यास करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पुणेगाव धरण पाणी वापराबाबतही यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस आमदार राहुल आहेर, जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे, मुख्य अभियंता व सह सचिव प्रसाद नार्वेकर उपस्थित होते.

मंत्री श्री. विखे–पाटील म्हणाले, लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी मंजूर असलेले पाणी उपलब्ध झाले पाहिजे. मंजूर पाणी विहित कालावधीत सोडण्याबाबत विलंब झाल्यास यासाठी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.




## जिगाव प्रकल्पाच्या भूसंपादनाबाबत आठ दिवसात नव्याने प्रस्ताव सादर करावा – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई : बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव प्रकल्पाच्या भूसंपादनाबाबत शेतकऱ्यांनी ४० टक्के वाढीव मोबदला मागितला आहे. त्यामुळे ८ हजार ७८२ दावे प्रलंबित असून ते निकालात काढणे आवश्यक आहे. हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असून त्यासाठी २५ टक्के वाढीव मोबदला देण्याबाबत नव्याने प्रस्ताव तयार करुन पाठवावा. यासाठी सर्व शेतकरी, अधिकारी आणि वकील यांची एकत्रित बैठक घेण्यात यावी, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुलढाण्याचे जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मिलिंद म्हैसकर, जलसंपदा सचिव डॉ. संजय बेलसरे, मुख्य अभियंता संजय टाटू, अश्विनी सैनी आणि बुलढाणा जिल्हाधिकारी किरण पाटील आदी उपस्थित होते.

महसूल मंत्री श्री.बावनकुळे म्हणाले, जिगाव प्रकल्प हा शेतकऱ्यांच्या शेतीच्या पाण्यासाठी महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी जमीनीचे संपादन करणे आवश्यक आहे. संपादनासाठी शेतकऱ्याच्या सहमतीची आवश्यकता असून त्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांना २५ टक्के वाढीव मोबदल्याने थेट खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा. आठ दिवसामध्ये हा प्रस्ताव सादर केल्यानंतर मदत व पुनर्वसन प्राधिकरणाकडे बैठक घेण्यात येऊन निर्णय घेतला जाईल.

भूसंपादनाचा प्रश्न तात्काळ सोडविण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करण्यात यावे, असेही मंत्री श्री.बावनकुळे यांनी सांगितले. शेतकऱ्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी. त्याबरोबरच हा प्रकल्प लवकर मार्गी लावण्यासाठीही प्रयत्न केले जावेत. ८ हजार ७८२ प्रकरणांपैकी ५६५ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. जिगाव प्रकल्प हा २६ टीएमसीचा प्रकल्प असून याद्वारे बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा, जळगाव, जामोद, शेगाव, खामगाव, संग्रामपूर, मलकापूर आणि अकोला जिल्ह्यातील तेल्हारा व बाळापूर या तालुक्यातील एकूण २८७ गावांना सिंचनाचा लाभ होणार आहे.

## खाडीत सोडण्यात येणाऱ्या प्रदूषित पाण्यामुळे मासेमारीवर होणाऱ्या परिणामासंदर्भात अभ्यास समिती स्थापन करावी – सभापती प्रा.राम शिंदे

मुंबई :– राज्यातील मुंबई, ठाणे, बेलापूर, उलवे, तळोजा येथील खाड्यांमध्ये औद्योगिक क्षेत्रामधून सोडण्यात येणारे सांडपाणी आणि डम्पिंग ग्राऊंडचा कचरा यामुळे प्रदूषण वाढत असून त्याचा फटका मासेमारी व्यवसायाला बसत आहे. याबाबत पर्यावरण, मत्स्यव्यवसाय आणि उद्योग विभागांनी दखल घ्यावी. यासंदर्भातील संशोधन संस्थांच्या मदतीने विषयतज्ज्ञांचा समावेश असलेली अभ्यास समिती सात दिवसाच्या आत स्थापन करुन एक महिन्यात अहवाल द्यावा, जेणेकरुन हे प्रदूषण रोखता येईल, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.

विधान भवन, मुंबई येथे अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील ०५ मार्च, २०२५ रोजीच्या यासदंर्भातील विधानपरिषदेतील लक्षवेधीबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. विधानपरिषद सदस्य प्रसाद लाड, विक्रांत पाटील, ड.निरंजन डावखरे, प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.ज्ञानेश्र्वर म्हात्रे यांच्या महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेल्या लक्षवेधी सूचना क्र.८८ संदर्भातील चर्चेप्रसंगी सभापती महोदयांनी संबंधित विभागाचे मंत्री, विधानपरिषद सदस्य आणि संबंधित अधिकारी यांची बैठक आयोजित करण्याचे निर्देश त्यावेळी दिले होते. या बैठकीस विधानपरिषद सदस्य ड.निरंजन डावखरे, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास सचिव डॉ.रामास्वामी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे डॉ.अविनाश ढाकणे, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे अधीक्षक अभियंता राहुल बनसोड उपस्थित होते.

दूषित पाणी समुद्रात सोडले जात असल्यामुळे मासेमारी व्यवसायावर परिणाम होत आहे. यासंदर्भात शाश्र्वत धोरणाची आवश्यकता असल्याचे यावेळी विधानपरिषद सदस्य ड.निरंजन डावखरे यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी यासंदर्भात एकात्मिक धोरण आवश्यक असल्याचे सांगून अभ्यास समितीची सात दिवसात स्थापना व्हावी आणि या समितीने एक महिन्याच्या आत अहवाल द्यावा असे निर्देश दिले. त्यानुसार सेंट्रल मरीन फिशरीज रिसर्च इंन्स्टिट्यूट (सी.एम.एफ.आर.आय.), कोची तसेच नॅशनल एन्व्हॉअरमेंट इंजिनियरिंग रिसर्च इंन्स्टिट्यूट (एन.इ.इ.आर.आय.), नागपूर या संस्थेच्या मदतीने विषयतज्ज्ञ आणि संबंधितांची समिती नेमण्यात येणार आहे.

## शूर मराठा सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार मिळवण्यात राज्य सरकारला मोठे यश !

मुंबई – नागपूरकरच्या भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्वाचे सरदार रघुजी भोसले यांची लंडन येथे लिलावात निघालेली तलवार मिळवण्यात सरकारला मोठे यश आले आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी आज येथे दिली.



अशा प्रकारे लिलाव जिंकून आपली ऐतिहासिक वस्तू परदेशातून परत मिळवण्याची ही पहिलीच वेळ असून याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ड. आशिष शेलार यांनी आभार मानले आहेत.

ऐतिहासिक दस्तऐवज असलेली सदर तलवार लिलावात निघाल्याचे वृत्त काल अचानक येऊन महाराष्ट्रात धडकले. सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांना ही बातमी कळताच त्यांनी तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन सदर तलवार शासनाला मिळावी या दृष्टीने नियोजन करण्यात आले. सांस्कृतिक कार्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांना दूतावास संपर्क व या कामाची जबाबदारी देऊन स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ड. आशिष शेलार यांनी रात्री उशिरा पर्यंत याबाबतचे नियोजन व संपर्क यंत्रणा उभी केली. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचने प्रमाणे ड. आशिष शेलार यांनी तातडीने एक मध्यस्थ उभा करुन या लिलावात शासनाने सहभाग घेतला व लिलाव जिंकला. यासाठी हातळणी, वाहतूक व विमा खर्चासह सुमारे ४७.१५ लाख रुपये यासाठी खर्च अपेक्षित आहे.

याबद्दल आज पत्रकार परिषद घेऊन ड. आशिष शेलार यांनी मुख्यमंत्र्यांचे विशेष आभार मानले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकारच्या नावाने एक इतिहास नोंद होईल असा हा आनंदाचा क्षण आहे, अशी भावना यावेळी ड. आशिष शेलार यांनी व्यक्त केली.

तलवारीचे ऐतिहासिक महत्त्व रघुजी भोसले प्रथम (१६९५ ते १४ फेब्रुवारी १७५५) हे नागपूरकर भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्वाचे सरदार होते. रघुजी भोसले यांचे शौर्य आणि युद्धनीती यांवर प्रसन्न होवून छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना ‘सेनासाहिबसुभा’ ही पदवी दिली होती. रघुजी भोसले प्रथम यांनी १७४५ आणि १७५५ मध्ये बंगालच्या नवाबाविरुद्ध युद्धमोहिमांचे नेतृत्व करून मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला. याचबरोबर रघुजींनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये चांदा, छत्तीसगढ, संबळपूर याही प्रदेशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. दक्षिण भारतातील कुड्डाप्पाचा नवाब, कर्नूलचा नवाब यांचाही पराभव करून दक्षिण भारतात आपला लष्करी आणि राजकीय दबदबा निर्माण केला. अठराव्या शतकातील एक अत्यंत धाडसी मराठा सेनानी म्हणून रघुजी भोसलेंकडे बघितले जाते. नागपूर भोसलेंच्या भौगोलिक सीमांमध्ये लोखंड, तांबे यांच्या खाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होत्या. यांचा वापर वस्तूंसोबतच शस्त्रे बनवण्यासाठीही केला जात असे. नागपूरकर भोसले घराण्यातील राजशस्त्रे निर्मिती आणि सौंदर्य यांचा अजोड मिलाफ आहेत.

आज लंडन येथे लिलावात निघालेली रघुजी भोसले यांची तलवार ही मराठा शैलीच्या ‘फिरंग’ पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. सरळ, एकधारी पाते आणि सोन्याचे नक्षीकाम केलेली मुल्हेरी घाटाची मूठ ही तलवारीची वैशिष्ट्ये आहेत. तलवारीचे पाते हे युरोपीय बनावटीचे असून पात्याच्या खजान्याजवळ पाते बनवणाऱ्या कंपनीचे नाव आहे. युरोपीय बनावटीची पाती ही मध्ययुगीन भारतातल्या उच्च वर्गांमध्ये प्रसिद्ध होती. पात्याच्या पाठीवर तळाशी ‘श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा फिरंग’ हा देवनागरी लेख सोन्याच्या पाण्याने लिहिलेला आहे. पात्यावरील लेख ही तलवार रघुजी भोसले यांच्यासाठी बनवली गेली होती किंवा त्यांच्या वापरातील होती याकडे निर्देश करतो. तलवारीच्या मुल्हेरी मुठीवर सोन्याच्या पाण्याने कोफ्तगरी नक्षी काढलेली आहे. तलवारीच्या उभट मुसुमेला हिरव्या रंगाचे कापड गुंडाळलेले आहे.

रघुजी भोसले प्रथम यांची ही फिरंग तलवार अनेकार्थांनी महत्वपूर्ण आहे. बहुतांशी मध्ययुगीन मराठा शस्त्रांची कमी अथवा अजिबात नसलेले नक्षीकाम आणि शस्त्रांवरील निर्माणकर्त्यांच्या किंवा वापरकर्त्याच्या नावाचा अभाव ही ठळक वैशिष्ट्ये होती. या दोन्हीसही अपवाद म्हणून रघुजी भोसले यांच्या तलवारीवर नावाचा लेख तसेच नक्षीकाम केलेले आहे. तलवारीचे युरोपीय बनावटीचे पाते अठराव्या शतकातील भारतातील आंतरराष्ट्रीय शस्त्रव्यापाराकडे निर्देश करते.

नागपूरकर भोसलेंची १८१७ मध्ये सीताबर्डी येथे ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध लढाई झाली. या लढाईमध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा विजय झाल्यावर कंपनीने नागपूरकर भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली. यामध्ये अनेक मौल्यवान वस्तू, दागिने तसेच शस्त्रांचाही समावेश होता. नागपूरचे संस्थान खालसा झाल्यावर ईस्ट इंडिया कंपनीला वेळोवेळी नजराणे आणि भेटीही मिळाल्या होत्या. रघुजी भोसलेंची तलवार युद्धानंतरच्या लुटीमध्ये अथवा ब्रिटिशांना दिलेल्या भेटींमध्ये देशाबाहेर गेली असण्याची शक्यता आहे, जाणकार व्यक्त करीत आहेत.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

## सामाजिक क्रांतीचे जनक : महात्मा बसवेश्र्वर

सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्र्वर यांची आज जयंती. दरवर्षी अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्र्वर यांची जयंती साजरी केली जाते. महात्मा बसवेश्र्वर यांचा जन्म ११०५ मध्ये झाला. महात्मा बसवेश्र्वर हे बिज्जल राज्याच्या दरबारात महामंत्री होते. महात्मा बसवेश्र्वर यांना सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हणतात कारण त्यांनी प्रचलित सनातनी धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, स्त्री–पुरुष, उच्चनीच, श्रेष्ठ–कनिष्ठ भेदभाव यासारख्या कुप्रथांच्या विरोधात बंड पुकारले. हे बंड म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृती विरुद्ध पुकारलेला एल्गार होता. या बंडात सामाजिक क्रांतीची बीजे पेरली गेली होती. बाराव्या शतकात भारताचे समाज जीवन अंधकारमय झाले होते. समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, भेदभाव वाढत चालला होता. बहुदेवता उपासना, पुरोहित वर्गाची मक्तेदारी, पाप पुण्याची दहशत, उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ, स्त्री– पुरुष भेदभाव इत्यादींनी भारतीय समाजमन बेजार झाले होते. अशा वेळी भारतीय समाजमन जागृत करुन माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्र्वर यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजसत्तेशी, राज सत्तेशी मोठा संघर्ष करावा लागला. माणूस हा जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो अशी त्यांची धारणा होती म्हणूनच तत्कालीन व्यवस्था बदलून नवी समाजव्यवस्था त्यांचे निर्माण केली. जिथे उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ, स्त्री–पुरुष, जात–पात असा कुठलाही भेदभाव नाही, विषमता नाही. कर्मकांड, अंधश्रद्धा नाही अशी समाजव्यवस्था महात्मा बसवेश्र्वर यांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून आणून दाखवली म्हणूनच त्यांना दक्षिणेतील गौतम बुद्ध असे म्हणतात. प्रत्येकाने कर्म करूनच जगले पाहिजे. जन्माच्या आधारे भेदभाव नाही. या त्यांच्या या विचारांची अंमलबजावणी पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली. जगातील पहिली संसद असे ज्याचे वर्णन केले जाते ती अनुभव मंटप नावाची परंपरा त्यांनी सुरू केली. अनुभव मंटप हे असे सार्वजनिक ठिकाण होते जिथे सर्व समाज घटकांतील स्त्री पुरुष एकत्र बसून आपआपले अनुभव सांगत आणि त्यातून समाज म्हणून एकत्रितपणे पुढे जाण्याचे नियम ठरत. महात्मा बसवेश्र्वरांचे एक वचन आहे. कायकवे कैलास कैलास म्हणजे मोक्ष, म्हणजे काम केल्यानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी कुठल्याही कर्मकांडाची गरज नाही. महात्मा बसवेश्र्वरांनी आपल्या सहकार्यांच्या मुलगा आणि मुलीच्या विवाहास समर्थन दिले जो आंतरजातीय विवाह होता. मुलगा हा चांभार समाजाचा तर मुलगी ब्राह्मण समाजाची होती. महात्मा बसवेश्र्वरांच्या या सुधारणावादी, समतावादी कार्याने खवळलेल्या सनातन्यांनी या घटनेचे भांडवल करून लोकांना भडकवले आणि दुसऱ्या बाजुला राजा बिज्जलचा खून करुन त्याचा आळ महात्मा बसवेश्र्वरांवर आणला. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव महात्मा बसवेश्र्वर जीव वाचवण्यासाठी तेथून पळाले पण सनातन्यांनी अनेक शरण, शरणार्थ्यांची हत्या केली. त्यांनतर महात्मा बसवेश्र्वरांनी पुन्हा समतावादी लिंगायत धर्माची परंपरा वाढवण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्र्वर यांचे समतावादी, सुधारणावादी विचार आपल्या जीवनात आचरणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. जयंतीदिनी महात्मा बसवेश्र्वर यांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदणीकृत कर्मचाऱ्यांचा खाकी गणवेश; १ मे पासून अंमलबजावणी - कामगार मंत्री ड.आकाश फुंडकर

मुंबई, : राज्यातील नोंदणीकृत सुरक्षा



कर्मचाऱ्यांसाठी खाकी रंगाच्या गणवेशास शासनाने मान्यता दिली. यामध्ये टोपी निळ्या रंगाची असून, त्यावर सुरक्षा रक्षक मंडळाचा लोगो व नाव असणार आहे. त्याचबरोबर कामगार दिनाचे औचित्य साधून हा खाकी गणवेश दि. १ मे २०२५ पासून राज्यभरात अंमलात येणार असल्याची माहिती कामगार मंत्री ड. फुंडकर यांनी दिली.महाराष्ट्र राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी नव्याने निश्र्चित करण्यात आलेल्या खाकी रंगाच्या गणवेशाचे अनावरण कामगार मंत्री ड. फुंडकर यांच्या हस्ते नरीमन भवन, मुंबई येथे करण्यात आले.सुरक्षा रक्षकांच्या गणेवेशाच्या रंग खाकी असावा, अशी मागणी विविध संघटना व सुरक्षा रक्षकांनी शासनाकडे केली होती. कामगार मंत्री यांनी ही मागणी मान्य केली आहे. राज्यभरात जिल्हानिहाय १६ सुरक्षा रक्षक मंडळे कार्यरत असून आता १ मे पासून राज्यातील सर्व सुरक्षा रक्षकांच्या गणवेशात एकसमानता असणार आहे. या उपक्रमामुळे सुरक्षा रक्षकांची ओळख एकसंघ राहील व त्यांच्या शिस्तबद्धतेत भर पडेल. तसेच या नव्या गणवेशामुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेला अधिक सुसंगत व व्यावसायिक स्वरूप प्राप्त होणार असल्याचेही कामगार मंत्री ड.फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

# हा कलह भारतीयासाठी घातकी !

## संपादकीय...

भारतीय जनतेसमोर, सरकार समोर अनेक समस्या, सर्वकष सुविधाचा प्रश्न, विकासात्मक बाबी आणी नागरी समस्याचा डोंगर उभा असताना त्यावर पर्याय न शोधता जात, पंत, धर्म, भाषा अशा पूळचट विषय पूढे करुन विविध जाती, धर्माच्या समूहात तणाव निर्माण सत्ताधारी नेते विरोधी पक्षाचे नेते आणी त्यात विष कालविणारी यंत्रणाना काय साध्य करायचे आहे ही बाब सर्वसामान्य जनतेस खूपत असून अशा जात, धर्म, भाषा वादावरुन जो सामूहीक, सामाजीक कलह निर्माण केला जातो आहे तो तमाम भारतीय नागरीकासाठी घातकी ठरु शकतो अशीच संतापजनक प्रतिक्रिया सर्वदूरस्तरातून व्यक्त होताना दिसते आहे. ती गंभीर वाटते.

महागाई, भ्रष्टाचार, लाचखोरी, बेरोजगारी, अन्याय, अत्याचार, सर्वांगीण विकास, नागरी समस्या बद्दल सत्ताधारी ना विरोधीपक्षनेते बोलत नाहीत तर केवळ सत्तास्पर्धा, एकमेकाची उणेदुणे काढणे, परस्परविरोधी चिमटे काढणे यापेक्षा दुसरे कांहीच न करता केवळ जात, धर्म आणी भाषावाद काढून जाती, जातीत धर्मा, धर्मात तांडव निर्माण करून राजकीय पोळी भाजून घेण्याचा गोरख धंदा सर्वपक्षीय राजकीय पक्षाच्या नेत्याकरवी होताना दिसतो आहे विशेषता, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ प्रणीत भाजपाच्या केंद्र सरकारने अर्थात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणी संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी तर कमेला गुंडाळून कॉग्रेस विरोधात बोलण्यापलिकडे त्यांच्याकडे दुसरा कोणता विषय नसेलच याचीच लाज ऐकणाऱ्याना व वृत्तपत्र वाचणाऱ्यानाच वाटत असावी असेच उलट चित्र दिसते आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये असाच बोलबाला होताना दिसतो आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी स्वतःला ओबीसी म्हणवून घेतात पण सारे भारतीय केवळ हिंदूच आहेत अशी वल्गना करतात, आरएसएसच्या मोहन भागवत यांचेविषयी बोलण्यातच अर्थ नाही, कारण स्वतः सालसूद राहून दुसऱ्याच्या हातून, तोंडून वावद निर्माण करणे, सारे खापर स्थानीक यंत्रणेवर फोडणे आणी पून्हा लोकशाही, संविधानाची भाषा करणे ही नौटंकी मोहनजी भागवत आणी भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानाच जमू शकते अशीच हासरी कुजबूज दररोजच चौका, चौकात होताना दिसते आणी अनेकजन वृतपत्राचे सामूदायीक वाचन करताना दिसतात ही वास्तव परिस्थितीच नाकारता येण्यासारखी नसावी म्हणून जात, धर्म, भाषावर वाद, कलह हा लोकशाही, संविधानासह तमाम भारतीय जनतेसाठी घातकी ठरावा असाच बोलबाला होताना दिसतो आहे.

भल्या, भल्या महात्म्यानी जातीयवावद संपविण्यासाठी प्रयत्न केले परंतू राजकारण्यानी ते जातीय राजकारणच घट्ट करून ठेवले, धर्माला बळकटी देवून विविध धर्मीयाचे, जातीचे निवडणूक, मतासाठी लांगूणचालन करुन त्याना पून्हा वेठीस धरणे हे नित्याचेच असताना उर्दू नामफलकावरुन मुस्लिम समाजाला टार्गेट केले गेले, तत्पूर्वी औरंगजेब कुलगी तूरा झाला, आता इंग्रजी, मराठी, हिंदी असा त्रिकोणीवाद सुरु झाल्याने जाती, जातीत, धर्मा, धर्मात आणी भाषावाद नागरीकात मतभेद निर्माण होण्यास राजकीय नेते खतपाणी घालून सामाजीक ऐक्यात विष, द्वेष पेरु शकतात की काय असाच संशय व्यक्त होताना दिसतो आहे. अभ्यासक्रम तयार करणारी मंडळी दिल्लीत पण भांडणे महाराष्ट्रात ती ही मराठी भाषीक मराठी माणसानाच होत असतील तर प्रत्येक महिला पुरुषाचे रक्त तपासून कोण कोणत्या जातीचा, कोणत्या धर्माचा आणी भाषेचा आहे यासाठी ईडी, सारखीच दुसरी एखादी यंत्रणा निर्माण करावी लागेल हीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे ती गैर नसावी .

# पहलगाम : भ्याड दहशतवादी हल्ला !

'किसी मुल्क को बर्बाद करना हो तो लोगो को धर्म के नाम पर लढा दिजिए, मुल्क अपने आप बर्बाद हो जायेगा' – लियो टॉलस्टाय यांचे उद्गार आज खरे ठरत आहेत. २२ एप्रिल २०२५ रोजी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष बेन्स हे भारतात होते, पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात होते. भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरमध्ये देशाच्या विविध भागातून आलेले हजारो पर्यटक निसर्ग सौंदर्याचा मनसोक्त आनंद लुटत होते. काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला पर्यटन व्यवसाय बहरत असतांना दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २८ हिंदू पर्यटकांना समोरून गोळ्या घातल्या. त्याची प्रतिक्रिया म्हणून देशात संतापाची लाट उसळणे नैसर्गिक होते. या वेळी समस्त विरोधी पक्षांनी सरकारला दिलेला एकमुखी पाठिंबा आणि विविध मुस्लीम संघटनांनी दिलेला संयमी आणि संवेदनशील प्रतिसाद हे सरकारसाठी जमेचे मुद्दे आहेत. पुलवामाप्रमाणेच या वेळीही सुरक्षा यंत्रणेबाबत काही गंभीर शंका आहेत.

पहलगाम हे पर्यटकांचे मोठे आकर्षण स्थळ आहे. सर्व देशातून काश्मीरमध्ये येणारे पर्यटक श्रीनगर, गुलमर्ग आणि पहलगाम येथे हमखास येतात, पहलगाम हे भारत–पाकिस्तान सरहद्दपासून बरेच दूर आहे. सरहद्दीपासून पहलगामला पोहोचायला ८ तास तरी लागतातच. अशा दूर अंतरावर पाकिस्तानमधून आलेले प्रशिक्षित व सशस्त्र दहशतवादी पोहोचले तरी कसे? हे गूढ अजून उकललेले नाही. किश्तबाडमधून त्रालच्या दाट जंगलातून हे पायपीट करुन आले असण्याची शक्यता आहे. पण ते पहलगामला पोहोचून तेथे २८ हिंदू पर्यटकांचे रक्ताचे सडे उडवेपर्यंत जम्मू–काश्मीर पोलीस, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव सुरक्षा दल, निमलष्करी दले आणि लष्करी सैन्यदलाला सुद्धा त्याचा चांगपत्ता लागला नाही, याचे मोठे आश्र्चर्य वाटते. जम्मू काश्मीर हा देशातील सर्वांत मोठा संवेदनशील व हाय सिक्युरिटी झोन आहे. पाकिस्तानच्या सरहद्दीला लागून हे राज्य आहे. २४ तास डोळ्यांत तेल घालून तेथे घडणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते, मग यावेळी आपण कमी कुठे पडलो?

सुमारे दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षा रक्षक नसणे, गुप्तचर यंत्रणेला सुगावा न लागणे याची जबाबदारी कोणाची? काश्मीरचे स्थित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन खोऱ्यात निरपराध व निष्पाप पर्यटकांच्या हत्याकांडाने रक्ताचा सडा पडला. त्या दिवशी बेसरनमध्ये येऊन कुणी घोडेस्वारीचा आनंद घेत होते तर कुणी खाण्यापिण्यात मस्त दंग होते, मुले खेळत होते, मस्ती करत होते, कुणी फोटो काढत होते, तर कोणी व्हीडिओ शूटिंगमध्ये निसर्गाचे सौंदर्य टिपत होते. अचानक गोळीबाराचे आवाज आले, पोलिसांच्या गणवेषात काही धावतांना दिसले, पोलिसांबरोबर कुणाची तरी चकमक चालू आहे असे पर्यटकांना क्षणभर वाटले पण ने तरुण दहशतवादी हातात बंदूक घेऊन प्रत्येकाला नाव विचारावला लागले, तू हिंदू का मुस्लीम असा प्रश्र्न थेट विचारू लागले, कलाम पढायला सांगू लागले आणि एकापाठोपाठ एक अशा हिंदू पर्यटकांना डोक्यावर, छातीवर गोळ्या घालून ठार मारू लागले. पत्नी आणि मुलांसमोर त्यांनी पुरुष पर्यटकांवर गोळ्यांचा वर्षाय केला. एवढा मोठा रक्तपात काश्मीर खोऱ्यात कित्येक वर्षांत घडला नव्हता.

त्या दिवशी पहलगाम परिसरात २५०० पर्यटक होते, बेसरनच्या पठारावर मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ, गुजराती असे विविध भाषिक पर्यटक जमले होते. दहशतवाद्यांनी कुणालाही त्यांची जात, त्यांचा प्रांत किंवा त्यांची भाषा कोणती असा प्रश्र्न विचारला नाही, तर ते कोणत्या धर्माचे आहेत एवढाच प्रश्र्न विचारत होते, काहींनी पर्यटकांकडे आधारकार्ड व ड्रायव्हिंग लायसन्सची मागणी केली, ज्या पर्यटकांविषयी संशय आला त्यांच्या अंगावरची पेंट काढून खतना तपासला. खतना न केलेल्यांना त्यांनी जवळून गोळी घातली, जे गप्प बसले, तेही रक्ताच्या थारोळ्यात पडले. पहलगाममध्ये २५०० पर्यटक असतांना ज्या बेसरनमध्ये हत्याकांड घडले त्याच्या जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नव्हती, कुठेही पोलीस चौकी नव्हती, कुठेही गस्त नव्हती. दहशतवाद्यांना रोखायला कोणतीच सुरक्षा यंत्रणा नसावी हे असे कसे घडू शकते? विशेष म्हणजे गोळीबार झाल्यावर व २८ पर्यटकांची हत्या झाल्यावर दहशतवादी तिथेच काही काळ होते पण सुरक्षा व्यवस्थेला काही कळू शकले नाही, हे चिंताजनक आहे. दहशतवादी निश्र्चितच हत्याकांड घडविण्यापूर्वी अगोदर आलेले असणार, ते काही बंदुका हातात येऊन जंगलात फिरत बसणार नाहीत, मग ते कुठे राहिले, कुठे जेवले, त्यांना मदत करणारे स्थानिक कोण आहेत? घटनेनंतर पाच दिवस उलटले तरी त्याचा तपशील बाहेर आला नाही. पाकिस्तानच्या सीमेवरून दहशतवादी घुसले तेव्हा आपले सुरक्षा दल कुठे कुठे होते? दहशतवादी हे पोलिसांच्या किंवा लष्करी सैनिकांच्या गणवेषात पहलगामला आले होते, त्यांना सुरक्षा दलाचे गणवेष कुणी पुरवले? ते त्यांनी कुठे अंगावर घातले? अंगावरचे कपडे कुठे बदलले व कुठे लपवून ठेवले?

मोदी सरकारच्या दोन कारकिर्दीत पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने सर्व देशाचा धरकाप उडला होता. दहशतवादी देशात कसे घुसले? तिथपर्यंत कसे पोहोचले, सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या बसपर्यंत ते कसे पोहोचू शकले? साडेचारशे किलो आरडीएक्स हाय सिक्युरिटी झोनमध्ये कसे येऊ शकले? सुरक्षा दलाचे जवान विमानाने न जाता बसेसमधून प्रवास करीत आहेत ही माहिती दहशतवाद्यांपर्यंत कशी पोहोचली? पुलवामा हल्ला करणारे दहशतवादी कोण आहेत, कुठे आहेत? पुलवामाचा बदला म्हणून भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये पुसून बालाकोटला एअर स्ट्राईक करून दहशतवाद्यांचे असंख्य अड्डे उद्धस्त केले असे सांगितले गेले, मग त्यानंतरही काश्मीरवर दहशतवादी हल्ले कसे चालू राहिले? तेव्हा ४४ सुरक्षा दलाच्या सैनिकांची हत्या झाल्यावर इंटेलिजन्सचे अपयश म्हणून आरोप झाले, आता पहलगाम पर्यटकांच्या हत्याकांडानंतरही इंटेलिजन्सवर खापर फोडले जात आहे. पुलवामा हत्याकांडानंतर जम्मू–काश्मीरचे तत्कालीन उपराज्यपाल सतपाल मलिक यांनी त्या घटनेबाचत सरकारला दोष दिला होता. सरकारने दुर्लक्ष केले, असे म्हटले होते. पण त्या घटनेला कोण जबाबदार आहे हे कधी समजलेच नाही.

पहलगाम हत्याकांडाची जबाबदारी पाकिस्तान स्थित लष्कर–ए–तोयबाशी संलग्न असलेल्या द रेजिस्टेंस फ्रंट ने घेतली होती ती नंतर घुमजाव करून झटकली. दहशतवादी दक्षिण काश्मीरमधील कोकेरनाग येथून किश्तवाड मार्गे बेसरनला पोहोचले. बर्फाच्छादीत पर्वतांनी वेढलेल्या बेसरनच्या पठारावर दहशतवादी दुपारी ३ वाजता पोहोचले तेव्हा देशाच्या विविध भागांतून आलेले पर्यटक त्यांच्या मित्रमंडळी व परिवारासह मौज–मजा मस्तीत आनंद लुटत होते. आपल्याला कोणी प्रतिकार करणारे नाही, पर्यटक निःशस्त्र आहेत. जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नाही. हे दहशतवाद्यांना पूर्ण ठाऊक असावे. बेसरनपासून ५ किमी अंतरावर सीआरपीएफचा कॅम्प आहे, पण त्याची सुद्धा दहशतवाद्यांना पर्वा नव्हती.

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २०० निरपराध मुंबईकरांचा बळी गेला. मुंबई पोलीस दलातील धाडसी व आक्रमक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनाही दहशतवाद्यांशी लढतांना मरण आले, पण मुंबई सर्व दहशतवादी पोलिसांनी आलेले सर्व दहशतवादी वेचून–वेचून ठार मारले. एवढेच नव्हे तर अजमल कसाबला पोलिसांनी जिवंत पकडला व पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा सर्व जगाला दाखवला, त्याच कसाबला नंतर फाशी झाली. संसदेवर दहशतवादी हल्ला झाला तेव्हाही सर्व दहशतवादी संसदेच्या प्रांगणातच ठार मारले गेले. मुंबईवरील आणि संसदेवरील हल्यात दहशतवादी हे लष्करी गणवेषात होते. तसेच पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यातही दहशतवादी लष्करी गणवेषात होते. दुर्दैवाने पुलवामा येथील हल्ल्यात पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा म्हणून कोणाला पकडून जगाला दाखवता आलेला नाही. पहलगाम येथे हत्याकांड घडविणारे दहशतवादी कसे–कुठे पसार झाले ते अजून समजलेले नाही.

गेली सहा दशके जम्मू काश्मीरला घटनेतील ३७० कलमानुसार विशेष दर्जा होता. जम्मू–काश्मीरचा झेंडा सुध्दा वेगळा होता. केंद्राने केलेले कायदे काश्मीरच्या विधानसभेने मंजूर केल्यावर तिथे लागू होत असत. काश्मीरमध्ये हिंदुस्थानातील कोणात्याही व्यक्तीला मालमत्ता खरेदी करता येत नव्हते. मोदी सरकारने ३७० वे कलमच काढून घेतले, त्यावर संसदेने शिक्कामोर्तब ही केले. जम्मू–काश्मीरचे विभाजन करून लेह–लद्दाख वेगळा केला. काश्मीर हा केंद्रशासित प्रदेश केला. काश्मीरला विधानसभा दिली, पण पूर्ण दर्जा अजून मिळालेला नाही. मुख्यमंत्र्यापेक्षा जास्त अधिकार तेथील उपराज्यपाल यांना आहेत. पण अशा मुद्दयावरून काश्मीरमध्ये असंतोष व अशांतता कशी निर्माण होईल यासाठी पाकिस्तान सतत प्रयत्न करीत असतो. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर हे भारताच्या विरोधात नेहमीच गरळ ओकण्याचे काम करीत असतात.

१६ एप्रिल २०२५ रोजी इस्लामाबाद येथे एका परिषदेत ते म्हणाले, काश्मीर ही पाकिस्तानच्या गळ्यातील नस आहे, ती कधीही विसरली जाणार नाही. काश्मिरी बांधवांना त्यांच्या शौर्यपूर्ण संघर्षात एकटे सोडणार नाही पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ म्हणाले, भारताने पाकिस्तान शहरात घुसून कारवाई केल्यास त्याची किमत भारताला मोजावी लागेल. जर पाकिस्तानी नागरीकांना काही इजा झाली, तर भारतीय नागरीक सुरक्षित राहणार नाहीत. पहलगाममध्ये निरपराध २८ हिंदू पर्यटकांच्या भीषण हत्याकांडानंतर भारताने गप्प बसून सहन करावे असे पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांना वाटते काय? पहलगाम हत्याकांडानंतर त्याच्याशी आमचा काही संबंध नाही, हल्ला करणारे स्वातंत्र्य सैनिक असू शकतात अशी प्रतिक्रिया पाकिस्तानने व्यक्त केली होती म्हणूनच अजमल कसाबसारखा दहशतवादी चेहरा जिवंत पुरावा म्हणून भारताला, जगाला पुन्हा एक्दा दाखववा लागेल पहलगामची घटना म्हणजे पाकिस्तानकडून भारतावर हमाससारखा झालेला हल्ला आहे. आता भारत सरकार इस्रायलप्रमाणे सडेतोड उत्तर देणार, याची सारे जग वाट पाहत आहे. खरेतर पहलगाममध्ये हत्याकांड घडवून पाकिस्तानने भारताच्या विरोधात फार मोठा जुगार खेळला आहे.

टी.व्ही. स्टुडिओत बसून पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याची वल्गना करणारे अँकर आणि जनतेतील उन्मादी कोलाहल सरकारने आटोक्यात ठेवणे ही काळाची गरज आहे. युद्ध आणि मुत्सद्देगिरी हे गंभीर विषय टीआरपीसाठी वापरले जाऊ शकत नाहीत. देशातील व्हीआयपी आणि व्हीव्हीआयपी यांची संख्या जगात सर्वाधिक आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी हजारो प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी गुंतले आहेत. त्याची खरच गरज आहे का? एकीकडे सैन्य संख्या रोडावत आहे, तेथे अग्निवीरसारखी कंत्राटी योजना राबविण्यात येते तर दुसरीकडे या तथाकथित अति महत्त्वाच्या व्यक्तींना संरक्षण देण्यासाठी प्रशिक्षित कमांडोजची नेमणूक करण्यात येते आणि काश्मीरमध्ये दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षा कर्मचारी नसणे हे कितपत योग्य आहे याचा विचार केला पाहिजे.

भारताच्या सीमेवरील भौगोलिक व राजकीय परिस्थिती, प्रचंड मोठी सागरी सीमा लक्षात घेता अग्निवीर योजनेचा गांभीर्याने पुनर्विचार होणे गरजेचे आहे. सहा महिन्यांच्या प्रशिक्षणाच्या आधारे हे अग्निवीर सियाचिन, पूर्वोत्तर खडतर प्रदेश, पश्र्चिमेच्या वाळवंटात कसे टिकाव धरतील? चार वर्षांच्या सेवेनंतर ७५ अग्निवीर सेवानिवृत्त होणार याचे दडपण त्यांच्यावर नक्की असणार हासुद्धा महत्त्वाचा घटक आहे. नौदल आणि वायुसेनेतील अग्निवीरांसमोर तर तंत्रज्ञान आणि समुद्रावरील जीवनाशी जुळवून घेण्यासाठी किमान दीड ते दोन वर्षे जातील, हे नाकारता येत नाही. नुकतेच तातडीने सरकारने अत्यंत कडक निर्णय घेतले ते किती परिणामी ठरतात ते काळच ठरवेल. सरकारने बोलाविलेली सर्वपक्षीय बैठक हे स्वागतार्ह पाऊल होते परंतु या बैठकीत सहभागी होण्याऐवजी मा. पंतप्रधान बिहार दौऱ्यावर जाणे मात्र खटकणारे आहे. काश्मीर प्रश्र्न सोडविण्यासाठी कोणतीही जादूची छडी उपलब्ध नाही, तो केवळ मुत्सद्दीपणाने सुटू शकतो याबाबत तज्ज्ञाज्ध्ये एकमत आहे. पाकिस्तान भारताच्या तुलनेत सर्व आघाड्यांवर खूप मागे आहे. जसे तो राजकीय अस्थिरता, लोकशाही मूल्यांचा ऱ्हास यामुळे प्रदीर्घ काळ ग्रासला आहे, तेथील अर्थव्यवस्था डबघाईस तर महागाई, बेरोजगारी आणि परकीय कर्जाचे ओझे हे विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. दहशतवाद पोसल्याची किंमत त्यांना मोजावी लागत आहे. तर संयम, अराजकीय आणि धर्मनिरपेक्ष सैन्य, विकसनशील अर्थव्यवस्था आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही ही आपली बलस्थाने आहेत. पुलवामा हल्ल्याला आज सहा वर्षे पूर्ण झाली आहेत त्याचप्रमाणे पहलगाम आत्मघाती हल्ल्याला सुध्दा आज आठ दिवस झाली आहेत. देशभरात या २८ पर्यटकांना श्रद्धांजली वाहिली जात आहे. आजच्या दिनी त्या सर्व पर्यटकांना भावपूर्ण श्रध्दांजली!

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

## खेळ चैतन्य ..

खेळा मध्ये कधीही
राज कारणे नसावी
खिलाडू वृत्ती परंतु
राजकारणीअसावी

खेळा खेळ खंडोबा
कुरघोडी ना घुसावी
खेळ हवा पूर्ण मुक्त
दहशत ना दिसावी

मैदाना बाहेर कुस्ती
कायमअसते फसवी
मैदानामधली कुस्ती
लाल माती फासावी

पंच निर्णय वादग्रस्त
कळजराशी सोसावी
सहेतुक निकाल देती
नसतो कुणी गोसावी

तयारअसे टिकाकार
बंदूकलगेचं सरसावी
खेळाडू फसे भोव-या
समस्या ती भेडसावी

पदकांची आस लागे
अति अपेक्षा नसावी
खेळप्रतिक चैतन्याचे
जाणीव खरी असावी

## नितीमत्ता ..

अप्रिय काही घटना
राजीनामा त्वरे मागे
पिच्छापुरवता पुरता
सारखा तगादा मागे

अस्वस्थ असे सगळे
होईस्तोवर मनाजोगे
आवाहन अंतर्मनास
नैतिकतेस करे जागे

निराकुंश रे चौकशी
नकोत दिखावू ढोंगे
पायउतार व्हा आता
कर्ण कर्कश ते भोंगे

सवाल करतात हाल
सत्ता कशास्तवभोगे
बरोबर पकडा जाळे
उभेआडवे विणधागे

आजअसे राजीनामा
फुगवे अफवांचे फुगे
भाग पाडू झुकायला
अग्नीकुंड ते धगधगे

इतिहासांत डोकवावे
काय केले तुम्ही मागे
पार गाडून नितीमत्ता
बांधे आकर्षक थडगे

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

## महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त गुरुवारी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते राष्ट्रध्वजवंदन



लातूर : महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय समारंभ गुरुवार, १ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आला आहे. या वेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन होईल.

राष्ट्रध्वज वंदनाचा हा मुख्य शासकीय समारंभ सकाळी ८ वाजता होईल. या समारंभात सर्वांना सहभागी होता यावे, यासाठी इतर कार्यालये किंवा संस्थांनी १ मे रोजी सकाळी ७:१५ ते ९:०० या वेळेत राष्ट्रध्वजवंदन किंवा इतर कोणतेही शासकीय समारंभ आयोजित करू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे. एखाद्या कार्यालयाला किंवा संस्थेला स्वतंत्रपणे ध्वजवंदनाचा कार्यक्रम आयोजित करायचा असल्यास तो सकाळी ७:१५ पूर्वी किंवा सकाळी ९:०० नंतर आयोजित करावा.

स्वागतासाठी शाल, पुष्पगुच्छ आणू नका; पालकमंत्र्यांचे आवाहन

पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी कोणत्याही जिल्हा दौऱ्यावर स्वागतासाठी शाल किंवा पुष्पगुच्छ न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, लातूर जिल्हा दौऱ्यावर येताना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अधिकाऱ्यांनी भेटीसाठी शाल किंवा पुष्पगुच्छ आणू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# समूह विकास कार्यक्रमांतर्गत इच्छुक अंमलबजावणी यंत्रणांनी २ मे पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

लातूर : कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय फलोत्पादन मंडळामार्फत २०२१ पासून प्रायोगिक तत्त्वावर फलोत्पादन समूह विकास कार्यक्रम राबविला जात आहे. २०२५ मध्ये नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार 'मल्टी-कमोडिटी हाय व्हॅल्यू क्लस्टर' आणि 'पेरी-अर्बन व्हेजिटेबल क्लस्टर' या दोन संकल्पनांचा समावेश करण्यात आला आहे. यासाठी इच्छुक अंमलबजावणी यंत्रणांनी २ मे २०२५ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेचे उद्दिष्ट प्रमुख शहरांजवळ मोठ्या प्रमाणावर भाजीपाला उत्पादनासाठी क्लस्टर विकसित करणे, भाजीपाला संकलन, साठवणूक आणि विपणनाची व्याप्ती वाढवणे, शेतकरी उत्पादक संस्था (ऋझज), सहकारी संस्था आणि नवउद्योजकांना प्रोत्साहन देणे, तसेच देशांतर्गत आणि निर्यात बाजारपेठेत स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी एकात्मिक पद्धतीने लॉजिस्टिक्स, मार्केटिंग आणि ब्रँडिंगद्वारे कृषी मूल्य साखळीतील अडथळे दूर करणे हे आहे. याशिवाय, काढणीपश्र्चात हाताळणी, मूल्यवर्धन आणि बाजार जोडणीसाठी पायाभूत सुविधांचा विकास, विस्तार आणि सुधारणा करणे हा देखील उद्देश आहे.

शेतकरी उत्पादक संघटना (एफपीओ/एफपीसी) आणि त्यांचे फेडरेशन, सहकारी संस्था, भागीदारी संस्था, कंपन्या किंवा त्यांचे संयोजन असलेल्या कायदेशीर संस्था या योजनेअंतर्गत अंमलबजावणी यंत्रणा (ख-) म्हणून पात्र आहेत.

मल्टी-कमोडिटी हाय व्हॅल्यू क्लस्टर अंतर्गत तीन बाबींचा समावेश आहे.

१. पूर्व उत्पादन आणि उत्पादन: शेतकऱ्यांची क्षमता बांधणी, पिकांचे लागवड साहित्य, पिकांची निगा पद्धती, सूक्ष्म सिंचन आणि कापणीपर्यंत शेतीचे यांत्रिकीकरण यांचा समावेश आहे.

२. काढणीपश्र्चात व्यवस्थापन आणि मूल्यवर्धन: कापणीनंतरची हाताळणी, साठवणूक, मूल्यवर्धन आणि पॅकेजिंग यांचा समावेश आहे.

३. लॉजिस्टिक्स, मार्केटिंग आणि ब्रँडिंग: क्लस्टर ब्रँडिंग आणि देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठेसाठी एकात्मिक लॉजिस्टिक्स विकास.

क्लस्टरमध्ये प्रमुख फलोत्पादन पीक असणे आवश्यक आहे. याशिवाय, कृषी विविधता आणि उत्पादकता वाढवण्यासाठी अतिरिक्त फलोत्पादन पिकांचा समावेश करता येईल. क्लस्टरमधील जमीन शक्यतो सलग असावी. जर सलग नसेल, तर डोंगराळ भागात कमाल ५० किमी आणि सर्वसाधारण भागात ८० किमी अंतर असावे. किमान वार्षिक फार्म गेट मूल्य १०० कोटी रुपये असावे. प्रकल्पातील मुख्य पिकाच्या फार्म गेट मूल्याच्या २५ टक्के इतके अर्थसहाय्य देय आहे.

पेरी-अर्बन व्हेजिटेबल क्लस्टर अंतर्गत दोन बाबींचा समावेश आहे.

१. पेरी-अर्बन उत्पादनमध्ये एफपीओ किंवा एफपीसी यांनी राबवायचे घटक, जसे की पिकांचे लागवड साहित्य, शेतीचे यांत्रिकीकरण, सूक्ष्म सिंचन, एकात्मिक खत/किड व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब.

२. अंमलबजावणी यंत्रणेद्वारे राबवायचे घटक: एफपीओची स्थापना आणि प्रोत्साहन, शेतकऱ्यांची/एफपीओची क्षमता बांधणी, सुधारित कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतीचे यांत्रिकीकरण, सूक्ष्म सिंचन, काढणीपश्र्चात व्यवस्थापन (संकलन व वितरण केंद्र, एकात्मिक पॅक हाऊस, रायपनिंग चेंबर, पूर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतवाहन, प्रक्रिया केंद्र), शीतगृह उभारणी, मूल्यवर्धन आणि पॅकेजिंग.

टोमॅटो, कांदा, बटाटा यांच्यासह कोबी, फ्लॉवर, भेंडी, वांगी, शिमला मिरची, काकडी, दुधी भोपळा, कोथिंबीर, लिंबू, आले, हिरवी मिरची, लसूण इ. पिके यामध्ये अनिवार्य आहेत. क्लस्टर आणि प्रस्तावित पायाभूत सुविधा उपभोग केंद्र/शहरापासून ५० ते १०० किमी अंतरावर असाव्यात. पेरी-अर्बन उत्पादन अंतर्गत एफपीओ किंवा एफपीसी यांनी राबवायच्या घटकांसाठी एकूण अर्थसहाय्याच्या ४० टक्के इतके अर्थसहाय्य देय आहे.

अंमलबजावणी यंत्रणेद्वारे राबवायच्या घटकांसाठी अर्थसहाय्य बँक कर्जाशी निगडित आहे. दोन्ही संकल्पनांमधील घटक विहित कालमर्यादेत पूर्ण केल्यास ५.१ टक्के अतिरिक्त प्रोत्साहनात्मक निधी अनुज्ञेय आहे. मात्र, बांधकामावरील खर्च प्रकल्प खर्चाच्या ३०टक्के पेक्षा जास्त नसावा.

पात्रता निकष आणि सविस्तर मार्गदर्शक सूचना राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या https://nhb.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक अंमलबजावणी यंत्रणांनी ऑनलाइन अर्ज https://www.nhb.gov.in/Online-pplication/OnlinešRegistrationšIntermediatePage.aspx येथे सादर करावेत. पहिल्या टप्प्यासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १५ मे २०२५ आहे. या तारखेनंतर प्राप्त अर्ज पहिल्या टप्प्यात विचारात घेतले जाणार नाहीत.

६ मे २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ, प्लॉट क्र. ८५, सेक्टर-१८, गुरुग्राम येथे ऑनलाइन आणि हायब्रिड पद्धतीने प्री-बिड परिषद/भागधारक चर्चासत्र आयोजित आहे. क्लस्टरसंदर्भातील अडचणी २ मे २०२५ पर्यंत clusters.nhbgov.in या ई-मेलवर कळवाव्यात. त्यानंतरच्या अडचणी विचारात घेतल्या जाणार नाहीत, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

# श्री महालक्ष्मी मंदिराचा कलशारोहण सोहळा उत्साहात साजरा



लातूर : लोकांना मंदिरात देवाच्या दर्शनासाठी जाण्यास वेळ मिळत नाही, तेव्हा अनेक भक्त मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊन जाताना दिसतात. त्यामुळे भाविकांना मंदिराच्या कळसाच्या दर्शनानेही फलप्राप्ती होते,असे प्रतिपादन काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.

लातूर शहरातील गांधी चौकातील श्री महालक्ष्मी मंदिराचा कलशारोहण सोहळा मंगळवारी थाटात पार पडला. कलशारोहण सोहळ्याचे औचित्य साधून भव्य शोभायात्रा, शिवदिक्षा , कीर्तन, महाप्रसाद अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य कलशारोहण सोहळा मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. याप्रसंगी श्रीशैलम पीठाचे जगद्गुरु डॉ. चन्नसिद्धाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी, डॉ. शांतविरलिंग शिवाचार्य महाराज, चंद्रशेखर शिवाचार्य महाराज , माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्यासह हिरामणअप्पा गवळी, भटू बुद्धाजी नामागवळी , अशोक मंडले , अशोक भाले, देवा अंजीरखाने, नारायण बहिरवाडे , सुरेश शहापूरकर, विजय लकडे , अनिल नायकू, प्रवीण हुंडीवाले, भालचंद्र हुच्चे, रमेश अंबरखाने, विनोद औंढेकर, सदाशिव आलमखाने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कलशारोहण सोहळ्याचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या सर्वच धार्मिक कार्यक्रमांना भाविक भक्तांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती. मान्यवरांच्या हस्ते नूतन कळसाचे विधिवत पूजन करण्यात आले.

गवळी समाजाचे मन दुधासारखे पांढरे शुभ्र असून ते धार्मिकही असल्याचे नमूद करून डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले की, आजचे जीवनमान अतिशय धावपळीचे झाले आहे. प्रवासात असताना एखाद्या मंदिरात प्रत्यक्ष दर्शनासाठी जाणे अशक्य होते, तेव्हा लोक गाडीतूनच मंदिराच्या कळसाचे दर्शन घेताना दिसतात. कळसाच्या दर्शनानेही परमेश्र्वराच्या दर्शनाची फलप्राप्ती होते. आज मनुष्य मोठ्या प्रमाणात धार्मिकतेकडे वळताना दिसत आहे, ही समाजासाठी अतिशय महत्वाची गोष्ट आहे. ईश्र्वराच्या चिंतनाने, दर्शनाने सर्व प्रकारच्या इच्छा - आकांक्षा पूर्ण होतात,असेही त्यांनी सांगितले. महालक्ष्मी मंदिराचा कळस अतिशय सुरेख आणि आकर्षक झाल्याचे त्यांनी बोलून दाखवले. श्रीशैलम पीठाचे जगद्गुरु डॉ. चन्नसिद्धाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी आपल्या मनोगतात श्री महालक्ष्मी मंदिराचा कलशारोहण समारोह आज पूर्णत्वास गेल्याचे सांगून मोक्ष ही लक्ष्मीची मूर्ती असल्याचे सांगितले. सोने, चांदी, तांबे हे सगळे धातू लोह असतात. कारण लोहाला शिखा वाहक म्हणतात. विद्युत शक्ती ही लोहापासूनच बनते. कळस बनविण्याकामी देवाचे आशीर्वादही लागतात. म्हणूनच कळसाला देवही म्हटले जाते. आपण जेव्हा कळसाच्या पाया पडतो, तेव्हा कळस आपला नमस्कार देवाला लवकर पाठविण्याचे काम करत असतो. म्हणून कळसाला अध्यात्मिक टॉवरही म्हणतात, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवकांत स्वामी गुरुजी व कुमारस्वामी गणाचार्य यांनी केले. जगद्गुरुंच्या आशिर्वचनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारोंच्या संख्येने भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकुमार झिपरे, मल्लिकार्जुन घुगरे, प्रकाश साठे, दत्ता झिपरे, माणिक आपुने, मन्मथप्पा हुच्चे, राम आपुने, काशिनाथ साठे, शंकर झिपरे, दिलीप झिपरे, मंगेश हुच्चे, अंकुश साठे, प्रकाश झिपरे, नागनाथ झिपरे, संजय हुच्चे, सोमनाथ कद्रे, राजू भास्कर, सिद्राम साठे, संतोष साठे, शिवाजी झिपरे, लखन घुगरे , पांडुरंग यादबुले , अश्र्विन टिप्परकर, बाळू घुगरे, यांसह गवळी समाजातील अनेक मान्यवरांनी परिश्रम घेतले.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्याकडून सारथी विभागीय कार्यालय बांधकामाची पाहणी



लातूर (प्रतिनिधी): लातूर येथे उभारण्यात येत असलेले 'सारथी'चे विभागीय कार्यालय, मुला-मुलींची वसतिगृह, आणि इतर उपक्रमाच्या इमारत बांधकांमाची पदाधिकारी, वरिष्ठ अधिकारी यांच्यासह पहाणी केली, वस्तीगृहाच्या १२ पैकी ७ व्या मजल्याचे काम सध्या सुरू आहे. एकूण काम प्रगतीपथावर असेल तरी, कामाचा दर्जा राखून जून २०२६ पूर्वी प्रकल्प पूर्णत्वास न्यावा, जेणेकरून वस्तीगृहात मुला-मुलींना प्रवेश देता येईल आशा सूचना यावेळी अधिकारी व कंत्राटदार राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिल्या आहेत.

आज, मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी दुपारी लातूर शहराजवळील बार्शी रोड परिसरातील छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) विभागीय कार्यालय लातूरच्या बांधकामाची पाहणी केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना काम वेळेत आणि दर्जेदार गुणवत्तापूर्ण करण्याच्याही सूचना दिल्या आहेत.

यावेळी माजी आमदार आणि विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सलीम शेख, कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, उपअभियंता राजेंद्र बिराजदार, सारथीचे प्रतिनिधी असलम शेख आणि अजय वाघमारे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॾ. किरण जाधव, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, संचालक हणमंत पवार आदींसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मराठा, मराठा कुणबी, कुणबी मराठा, या लक्षित गटाच्या आर्थिक, सामाजिक विकासासाठी विविध कल्याणकारी योजना राबवणाऱ्या छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या ('सारथी' ) वतीने लातूर येथे उभारावयाचे विभागीय कार्यालय व त्यासाठी २१ पदे, त्याचबरोबर या कार्यालयांतर्गत मुला मुलींची ५२० रहिवाशी क्षमता असलेली वस्तीगृहे ग्रंथालय, अभ्यासिका, कौशल्य विकास व प्रशिक्षण केंद्र असा एकत्रित प्रकल्प महाविकास आघाडी आघाडी सरकारच्या कार्यकाळात आमदार देशमुख पालकमंत्री असताना मंजूर झालेला आहे, त्यासाठी लातूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची ४ एकर जागाही त्याचवेळी उपलब्ध करून दिली आहे, प्रकल्पाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने वाढीव जागेचाही प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. या प्रकल्पासाठी १७३ कोटी रुपयांच्या निधी मंजुरी असून त्या माध्यमातून प्रकल्पाचे काम गतीने सुरू आहे. कामाची गती कायम राखावी, सर्व बांधकाम व इतर व्यवस्था दर्जेदार पद्धतीने पूर्ण कराव्यात त्यासाठी लागणारे सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल अशी ग्वाही प्रकल्प उभारणीची पहाणी केल्यानंतर यावेळी संबंधितांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिली आहे.

# मुंबईत होणारी 'वेव्हज' परिषद मनोरंजन क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी 'दावोस' ठरणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



मुंबइ: मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे दरम्यान 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा (वेव्हज्) कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या समिटच्या तयारीची पाहणी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

वेव्हज् २०२५ परिषद मुंबईत होतेय हे महाराष्ट्रासाठी गौरवास्पद आहे. जागतिकस्तरावर मनोरंजन क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी ही परिषद 'दावोस' ठरणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दुपारी तीनच्या सुमारास उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी जिओ वर्ल्ड सेंटरला भेट दिली. यावेळी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, उद्योग विभागाचे प्रधान सचिव श्री.अनबलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसु आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी परिषदेबाबत सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाला मिळाले ही अभिमानाची बाब असून असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे असे सांगत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टीतून ही परिषद साकार होत आहे. विशेष म्हणजे प्रधानमंत्री श्री. मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत.

भारत जगात आघाडीवर आहे हे सिद्ध करण्यासाठी ही परिषद महत्वाची असून मुंबई हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे तसेच मिडिया आणि मनोरंजनाचे हे केंद्र असल्याने या परिषदेमुळे मनोरंजन क्षेत्राला तांत्रिकदृष्ट्या नवी ओळख मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. या परिषदेमुळे आंतरराष्ट्रीय स्टुडिओज, प्रोडक्शन हाऊसेस, टेक कंपन्यांची भागीदारीची याची दारे खुली होतील असेही ते म्हणाले.

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान २०२५-२६

## फळे, फुले, मसाले आणि अळिंबी उत्पादनासाठी अर्ज करण्याचे आवाहन

लातूर : एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान २०२५-२६ अंतर्गत लातूर जिल्ह्यात फळे, फुले, मसाले लागवड, अळिंबी उत्पादन प्रकल्प आणि जुन्या फळबागांचे पुनरुज्जनन या घटकांचा समावेश आहे. यामध्ये विदेशी फळे, फुले, मसाले लागवड, आंबा, चिकू, संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू, आवळा यांच्या जुन्या फळबागांचे पुनरुज्जनन आणि अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी यांचा समावेश आहे. या योजनेचा उद्देश जिल्ह्यात विदेशी फळे, फुले आणि मसाल्याच्या पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढवणे तसेच जुन्या फळबागांची उत्पादकता सुधारणे हा आहे.

फुले लागवड अनुदान:कट फ्लॉवर्स (गुलाब, ॲस्टर, गोल्डन रॉड, बर्ड ऑफ पॅराडाइज, हेलिकोनिया, शेवंती इ.): प्रकल्प खर्च १.२५ लाख रुपये प्रति हेक्टर, एकूण खर्चाच्या ४०% (६०:४० प्रमाणात दोन हप्त्यांत), कमाल ५०,००० रुपये प्रति हेक्टर.

कंदवर्गीय फुले (निशिगंध, ग्लॅडिओलस, लिलियम, कॅलालिली, डेलिया इ.): प्रकल्प खर्च २.५० लाख रुपये प्रति हेक्टर, एकूण खर्चाच्या ४०% (६०:४० प्रमाणात दोन हप्त्यांत), कमाल १.०० लाख रुपये प्रति हेक्टर.

सुटी फुले (झेंडू, ॲस्टर, गॅलार्डिया, हेलिक्रायसम, शेवंती, मोगरा, जाई, जुई, झिनिया, बिजली इ.): प्रकल्प खर्च ०.५० लाख रुपये प्रति हेक्टर, एकूण खर्चाच्या ४०% (६०:४० प्रमाणात दोन हप्त्यांत), कमाल २०,००० रुपये प्रति हेक्टर.

मसाला पिके लागवड अनुदान:मिरची, हळद, आले: प्रकल्प खर्च १.०० लाख रुपये प्रति हेक्टर, एकूण खर्चाच्या ४०% (६०:४० प्रमाणात दोन हप्त्यांत), कमाल ४०,००० रुपये प्रति हेक्टर.

विदेशी फळपिके लागवड अनुदान:ड्रॅगन फ्रूट: प्रकल्प खर्च ६.७५ लाख रुपये प्रति हेक्टर, एकूण खर्चाच्या ४०% (६०:४० प्रमाणात दोन हप्त्यांत), कमाल २.७० लाख रुपये प्रति हेक्टर.

स्ट्रॉबेरी: प्रकल्प खर्च २.०० लाख रुपये प्रति हेक्टर, एकूण खर्चाच्या ४०% (६०:४० प्रमाणात दोन हप्त्यांत), कमाल ८०,००० रुपये प्रति हेक्टर.

अव्होकॅडो: प्रकल्प खर्च १.२५ लाख रुपये प्रति हेक्टर, एकूण खर्चाच्या ४०% (६०:४० प्रमाणात दोन हप्त्यांत), कमाल ५०,००० रुपये प्रति हेक्टर.

जुन्या फळबागांचे पुनरुज्जनन अनुदान:आंबा, चिकू, मोसंबी: प्रकल्प खर्च ०.६० लाख रुपये प्रति हेक्टर, खर्चाच्या ४०%, कमाल २४,००० रुपये प्रति हेक्टर.

अळिंबी उत्पादन प्रकल्प अनुदान:अळिंबी उत्पादन प्रकल्प: प्रकल्प खर्च ३०.०० लाख रुपये प्रति युनिट, खर्चाच्या ४०%, कमाल १२.०० लाख रुपये प्रति युनिट.

अळिंबी बीज उत्पादन केंद्र: प्रकल्प खर्च २०.०० लाख रुपये प्रति युनिट, खर्चाच्या ४०%, कमाल ८.०० लाख रुपये प्रति युनिट.

बटण अळिंबीसाठी कंपोस्ट प्रकल्प: प्रकल्प खर्च ३०.०० लाख रुपये प्रति युनिट, खर्चाच्या ४०%, कमाल १२.०० लाख रुपये प्रति युनिट.

कमी खर्चाचे अळिंबी उत्पादन केंद्र: प्रकल्प खर्च २.०० लाख रुपये प्रति युनिट, खर्चाच्या ५०%, कमाल १.०० लाख रुपये प्रति युनिट.

सर्व शेतकऱ्यांना आवाहन आहे की, विदेशी फळे, फुले, मसाले लागवड, अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी आणि आंबा, चिकू, संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू, आवळा यांच्या जुन्या फळबागांचे पुनरुज्जननासाठी महाडीबीटी पोर्टल (https://mahadbtmahait.gov.in) वर फलोत्पादन घटकाखाली अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर. टी. जाधव यांनी केले आहे.

# पारदर्शक, गतिमान व कालबद्ध सेवेसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम

राज्यातील नागरिकांना दिल्या जाणा-या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबध्द पध्दतीने देण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला आहे. हा अधिनियम २८ एप्रिल, २०१५ रोजी अंमलात आला आहे. त्यानुषंगाने राज्यामध्ये २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाच्या अनुषंगाने हा विशेष लेखष्ठ

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा एक क्रांतीकारी कायदा असून त्यामध्ये अनेक वैशिष्ठ्ये आहेत जी इतर राज्यांच्या तद्‌अनुषंगिक कायद्यांपेक्षा वेगळी आहेत. लोकसेवा वितरित करताना विविध बाबी साध्य करण्याचा या कायद्याचा उद्देश आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व, कालबध्दता, कार्यक्षमता, डिजिटल मंचाचा उपयोग करुन लोकसेवा वितरणामध्ये सक्षमता व पारदर्शकतेच्या संस्कृतीस चालना देण्यावर या कायद्याचा भर आहे. नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सार्वजनिक सेवांचा दर्जा उंचावणे व त्या विहित कालावधीत व जबाबदारीपुर्वक पुरविल्या जातील याची खात्री करणे हे या कायद्याचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३ नुसार, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवीत असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपीलिय प्राधिकारी आणि द्वितीय अपीलीय प्राधिकारी यांचा तपशिल आणि नियत कालमर्यादा या अधिनियमाखाली अधिसूचित करील. प्रत्येक पात्र व्यक्तीस (कायदेशीर, तांत्रिक, आर्थिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून) या अधिनियमानुसार राज्यातील लोकसेवा नियत कालमर्यादेच्या आत प्राप्त करण्याचा हक्क असेल.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार कोणतीही अधिसूचित लोकसेवा मिळविण्यासाठी कोणत्याही पात्र व्यक्तीस पदनिर्देशित अधिका-याकडे अर्ज करता येईल. असा अर्ज निकाली काढण्यासाठी नियत केलेल्या कालमर्यादेसह अर्ज मिळाल्याचा दिनांक एका विशिष्ट अर्ज क्रमांकासह अर्जदारास देण्यात येईल. प्रत्येक अर्जदार त्याला प्रदान केलेल्या विशिष्ट अर्ज क्रमांकासह त्याच्या ऑनलाइन अर्जाच्या स्थितीची पाहणी करू शकतो. या अधिनियमानुसार कोणतीही पात्र व्यक्ती ज्याचा अर्ज फेटाळला गेला आहे किंवा ज्याला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा प्रदान केली गेली नसेल अशी कोणतीही पात्र व्यक्ती, अर्ज फेटाळल्याचा आदेश मिळाल्याच्या किंवा नियत कालमर्यादा समाप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करू शकते.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, आपल्या आदेशात पात्र व्यक्तीला सेवा देण्यासाठी पदनिर्देशित अधिका-याला निर्देश देऊ शकतात किंवा त्यास अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत अपील फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करून अपील फेटाळू शकतात. प्रथम अपीलीय प्राधिका-याच्या आदेशाविरुद्ध अर्जदार प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत द्वितीय अपीलीय प्राधिकाऱ्यांकडे द्वितीय अपिल दाखल करू शकतो. पदनिर्देशित अधिकारी पुरेशा आणि वाजवी कारणाशिवाय लोकसेवा प्रदान करण्यात अयशस्वी झाल्यास ५०० पेक्षा कमी नसेल परंतु ५ हजार रूपयांपर्यंत असू शकेल एवढी शास्ती संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यावर लादली जाऊ शकते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत शासनाच्या अधिसूचित सेवा कालमर्यादेत मिळाव्या यासाठीआपले सरकार पोर्टल सेवेत आहे. यानुषंगाने https//:aaplesarkar.mahaonline.gov.in हे संकेतस्थळ उपलब्ध आहे.

# निवडणुकीतील आश्र्वासने पूर्ण करण्यासाठी आलोय! - मा. मंत्री आमदार अमित देशमुख




लातूर (प्रतिनिधी) : विधानसभा निवडणुकीनंतर माझी भेट हरंगुळ बु. गावाला आहे. निवडणुकीत दिलेल्या आश्र्वासनांची पूर्तता करण्यासाठी आज मी येथे आलो आहे, असे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी हरंगुळ बु. येथील नागरिकांशी संवाद साधताना सांगितले. हरंगुळ बु. च्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी सांगितले.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते आज, मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी दुपारी लातूर शहराजवळील हरंगुळ (बु), वरवंटी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी आमदार, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे, लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, व्हा. चेअरमन विजय देशमुख, संचालक शाम बरुरे, लातूर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, मजीप्रा शाखा अभियंता दत्तात्रय पाचगे, उपअभियंता ऊषा मोतीपवळे, शाखा अभियंता प्रिया पाटील, धनराज पाटील, संचालक हणमंत पवार, आनंद पवार, सुर्यकांत पाटील, रामचंद्र सुडे, सुर्यकांत सुडे, सरपंच शितल झुजारे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, या परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार आणि वरवंटी गावचे, सरपंच उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांच्या पाठपुराव्यातून सदरील कामे मंजूर करण्यात आली असून ही कामे अत्यंत जलद गतीने आणि दर्जा राखून पूर्ण करावीत. अशा सूचना या प्रसंगीत दिल्या. निवडणूक काळात जाहीरनाम्याच्या माध्यमातून दिलेले प्रत्येक आश्र्वासन पूर्ण करण्यासाठी आपण बांधील असून येत्या काही महिन्यात संपूर्ण आश्र्वासनांची पूर्तता केली जाईल अशी ग्वाहीही याप्रसंगी त्यांनी दिली.

गावच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे, पुढेही निधी उपलब्ध करून देऊ. हरंगुळ हे नाविन्यपूर्ण गाव आहे. पाणंद रस्त्याला सध्या शासनाने स्थगिती दिली आहे, ती स्थगिती उठली की पाणंद रस्त्याला मंजुरी देऊ. आऊटर रिंग रोडचे सर्वेक्षण लवकरच सुरू होईल. हरंगुळ ते आकारवाई शिवरस्ता होईल. रस्त्याच्या नियमानुसार तो रस्ता टिकला पाहिजे. रस्त्याचे काम गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार झाले पाहिजे. विकासकामामुळे लोकांच्या जीवनात बदल होत आहे. गावाच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा असे सांगून भाग्यश्री सुडे खून प्रकरणात आता सरकारी वकील नेमला आहे. सुडे कुटुंबियांना न्याय मिळेपर्यंत आम्ही त्यांच्यासोबत आहोत. गावाच्या परिसरातील अवैध धंदे बंद केले जातील. सांप्रदायिक परंपरेचे हे गाव आहे. या गावाचे वातावरण कलुषित होऊ देणार नाही असे सांगीतले.

**रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण कामाचा शुभारंभ**

**हरंगुळ बु ते वरवटी शिवरस्त्याच्या विकासासाठी ४० लाख रुपये**

लातूर शहरातील वरवटी रोड ते हरंगुळ येथे शिवरस्ता १.५ कि.मी. रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत ४०.०० लाख रुपये विकास निधी मंजूर झाला आहे. या १.५ किलोमीटर लांबीच्या शिवरस्ताचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण या निधीतून करण्यात येणार आहे, हा प्रकल्प ग्रामीण रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत पूर्ण केला जाणार आहे. तर मौजे वरवंटी ता. जि. लातूर येथे स्थानीक आमदार विकासनीधीतून १० लाख रु. निधीतून परशुराम पार्क समोरील रस्ता हरंगुळ रोड पर्यंत सिमेंट कॉंक्रीट करण्यात येणार आहे. तसेच मौजे वरवंटी येथील जिजाऊ नगरमध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकामसाठी स्थानीक आमदार विकासनीधीतून १० लाख रु. ची तरतूद करण्यात आली आहे, या सर्व विकासकामांचे भूमीपूजन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी हरंगुळ बु. येथे सरपंच शितलताई भीमाशंकर झुंजारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राजेंद्र बिराजदार, मंडळ अधिकारी नागनाथ खंदाडे, तलाठी तानाजी जाधव, ग्रामसेवक वि. व्ही. पाटील, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे शाखा अभियंता दत्तात्रय पाचंगे, परमेश्र्वर वाघमारे, राजाभाऊ वाघमारे, भीमाशंकर झुंजारे, शाम बोरुडे, आनंद पवार, सूर्यकांत पाटील, श्रीरामचंद्र सुळे, सुरेखा धुळे, बाबुराव शेळके, रामभाऊ सागर, हणमंत पवार, गणेश पाटील, वीरभद्र झुंजारे, रामभाऊ मगर तर वरवंटी येथे सरपंच पवन जाधव, प्रा. लता बावणे आदींसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हरंगुळ व वरवंटी येथील नागरिक उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी हरंगुळ येथील भीमाशंकर झुंजारे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली.

# आगवे येथे जिल्हास्तरीय जलसा गीत गायन स्पर्धत गूढे अव्वल स्थानी

प्रतिनिधि रत्नागिरी - दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया भारतीय बौद्ध महासभा च्या वतीने चिपळूण तालुक्यातील मौज गाव आगवे या ठिकाणी सावर्डे कुटरे तुरुंबव,यांच्या विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वा जयंती महोत्सव या निमित्ताने दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा स्तरीय प्रबोधनात्मक गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये एकूण ११ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता,उपस्थित मान्यवरांचे स्वागत समारंभ होऊन रात्री १० वाजता कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली,चिठ्ठी उडवून प्रत्येक संघाला नंबर देण्यात आला.

एकूण अकरा जलसा मंडाळानी भाग घेतला होता १) माता रमाई जनसेवा संगीत जलसा मंडळ मौजे तेऱ्ये, २) नवतरुण भिमसेवा संगीत जलसा कला मंच मांडकी, ३) भीमसेवा जलसा मंडळ कळंबस्ते, ४) भीम ज्योत जनसेवा जलसा मंडळ आंबवली खेड,५) भीम ज्योत जलसा मंडळ गुढे, ६) मुक्ती संग्राम आंबेडकरी जलसा कोकरे, ७) वैभव कला जलसा मंडळ ओमळी, ८) धम्मक्रांती जलसा कला मंच रत्नागिरी, ९) त्रिरत्न जनसेवा ज्यांचा मंडळ कुशिवडे, १०) नवतरुण संगीत जलसा मंडळ वहाळ, ११) भिमसेवा जलसा मंडळ मुचरी उपस्थित मान्यवरांचे स्वागत समारंभ होऊन रात्री दहा वाजता कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.चिठ्ठी उडवून प्रत्येक संघाला नंबर देण्यात आला त्याप्रमाणे नव तरुण भीम सेवा संगीत जलसा मंडळ मौजे मांडकी यांनी प्रथम गीत गायनाला सुरुवात केली सर्व संघाने सुंदर सादरीकरण करून उपस्थित जलसा कलाप्रेमी यांनी आनंद लुटला आणि जशी स्पर्धा रंगत गेली आणि एका पेक्षा एक सादरीकरण होत गेले तेव्हा मात्र परिक्षकांची खरी कसोटी पहायला मिळाली या स्पर्धेला परीक्षक,संजय पवार खांडोत्री,माधवराव मोहिते पाथर्डी,आणि संदेश कदम सर,शेणवडे यांनी योग्य निरीक्षण आणि परीक्षण करून निकाल जाहीर केला. याप्रसंगी रत्नागिरी जिल्हा आंबेडकरी कला मंच यांचे अध्यक्ष प्रा.प्रदीप मोहिते,सचिव सतीश जाधव सर तसेच धम्मक्रांती जलसा कला मंच रत्नागिरी यांचे अध्यक्ष मनोज जाधव सर उपस्थित होते.प्रथम क्रमांक,संजय कदम गुढे व द्वितीय क्रमांक,प्रदीप मोहिते ओंमळी,आणि तृतीय क्रमांक,सतीश जाधव कोकरे,तसेच उत्कृष्ट कवी,जनार्दन जाधव आगवे, यांना पुरस्कार देण्यात आला व उत्कृष्ट हार्मोनियम वादक,मौजे गाव तेऱ्ये यांना देण्यात आला,विभागातील सामाजिक कार्यकर्ते अध्यक्ष चंद्रकांत जाधव विजय पवार संजय जाधव अमरदीप मोहिते सुदेश कदम शरद पवार,विनोद कदम यांनी मेहनत घेऊन हा जयंती कार्यक्रम आनंदमय वातावरणात पार पडला,

# दयानंद इन्टीट्यूट ऑफ फार्मसीमध्ये निरोप समारोप संपन्न

लातूर -दयानंद इन्टीट्यूट ऑफ फार्मसीमध्ये बी. फार्मसी



अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना औपचारिकपणे सोमवारी निरोप देण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चाऊस वाजिद यांनी केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याविषयी शुभेच्छा देत स्पर्धा परीक्षेचे महत्व सांगून त्यांना प्रोत्साहित केले. आणि जीवनामध्ये यशस्वी होण्याचा मूलमंत्र सांगितला. यानंतर तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचे पुष्प गुच्छ व भेट वस्तू देऊन भावी आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. अंतिम वर्षातील श्र्वेता कलानी, सायमा शेख, अभिषेक ठोंबळे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन तृतीय वर्षातील अमृता हाळे, संपदा चार्थनकर, सुप्रिया जोगदंडकर आदिबा शेख, या विद्यार्थिनींनी केले तर कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.अविनाश चौधरी यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी प्रा.अरुण कोंडापुरे, प्रा. रोहित उसनाळे,प्रा.सुरज मुळजे, प्रा.गणेश तोडकर तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# धरण उशाला आणि घशाला मात्र कोरड.!

छत्रपती संभाजीनगरपासून अवघ्या साठ किलोमीटरवर जायकवाडीचं प्रचंड जलाशय तुडुंब भरलेला असतो. दरवर्षी धरण ८० ते ९० टक्क्यांपर्यंत भरतं. तिथून शहराला पिण्याचं पाणी दिलं जातं.पण दुर्दैव इतकं भयावह की,या शहरात दहा दिवसांनंतरही पाण्याचा एक थेंबही मिळत नाही.!

धरणाच्या भरल्या पाण्याकडे बघून घसा कोरडा पडतो, आणि नागरिक फक्त आशेवर जगतात.ही शोकांतिका नाही, तर सत्ताधाऱ्यांच्या अकार्यक्षमता आणि गलथान कारभाराची थेट कबुली आहे.नियोजनाचा प्रचंड अभाव या परिस्थितीसाठी सर्वात मोठी जबाबदारी महानगरपालिकेच्या सत्ताधाऱ्यांवर आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर आहे. ज्या शहरात पंधरा लाखांहून अधिक लोकसंख्या आहे,तिथे पाण्याचं इतकं भेसूर दुर्लक्ष अक्षम्यच आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना दहा दिवस वाट पाहावी लागते. ज्या दिवशी पाणी येतं, त्या दिवशी संपूर्ण घरातील माणसं पाणी साठवण्यासाठी कामाला लागतात.लाईट गेली तर? मग आणखी वीस दिवस पाण्याचा ठणठणाट.हा तर रोजच्या जीवनाचा भागच झाला आहे! या दहा दिवसांत टँकर राज खुले आम धुडगूस घालतात. टँकर कुठून येतात,कुठे जातात, याचा कुणालाच पत्ता नसतो.महापालिका आणि प्रशासन यांच्याकडे टँकर व्यवस्थेचा कोणताही पारदर्शक अहवाल नाही.शहरात प्रतिदिन हजारो लिटर पाणी विकलं जातं,परंतु गरीब जनता टाळ्या वाजवत पाणी मागते आणि श्रीमंत लोक टँकर मागवतात.हे न्यायाचं नव्हे,निर्लज्जतेचं दर्शन आहे.

राजकारणाचा बाजार झालाय छत्रपती संभाजीनगरच्या पाणी प्रश्र्नावर गेली अनेक वर्ष फक्त राजकारण केलं जात आहे.महापालिकेत सेना-भाजप युतीची सत्ता गेली वीस ते पंचवीस वर्षे कायम आहे.या सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या कारकीर्दीत शहराच्या पाणीप्रश्र्नासाठी ठोस उपाययोजना केल्या का?.उत्तर ठाम आहे - नाही! महापौर,आमदार,खासदार,मंत्री सगळे मिळूनही शहराला रोज पाणी देऊ शकले नाहीत.आता,सत्ता गेल्यावर हेच लोक आंदोलन करतायत!.मग नागरिकांचा प्रश्र्न आहे - जेव्हा सत्ता तुमच्या हातात होती, तेव्हा तुम्ही काय झोपले होते का? सत्ताधारी असो वा विरोधी, सगळ्यांनी मिळून नागरिकांच्या तहानलेल्या घशाशी खेळ खेळला आहे.

कोणीही या शहराला रोज पाणी मिळावं यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला नाही.समांतर जलवाहिनीचा फसलेला खेळ?. शहरासाठी समांतर जलवाहिनी प्रकल्प आणण्यात आला.परंतु या प्रकल्पाच्या टेंडरमध्ये भ्रष्टाचाराचा एवढा घाणेरडा खेळ झाला की,रस्तेखेच करण्यात वर्षानुवर्षे गेली.कोणत्या ठेकेदाराला काम द्यायचं,कोणाचा हिस्सा किती,यावरच सत्ता आणि प्रशासन बिझी राहिलं.या भ्रष्ट कारभारामुळे समांतर जलवाहिनीचा खर्च दुपटीने वाढला.गेल्या दहा वर्षांपासून या प्रकल्पाची केविलवाणी अवस्था आहे.दरवर्षी पालकमंत्री बदलतात,नवीन आश्र्वासनं दिली जातात, नवीन पाट्या लावल्या जातात. लवकरच शहराला रोज पाणी मिळेल' या गोंडस घोषणा केल्या जातात.पण प्रत्यक्षात नागरिकांच्या नळाला थेंबही नाही! नागरिकांची मरगळ कारणीभूत या सगळ्या फसवणुकीत सर्वात मोठं दुर्दैव म्हणजे नागरिकांची मरगळ. छत्रपती संभाजीनगरसारख्या इतिहासप्रसिद्ध शहरात आजवर पाणी प्रश्र्नावर भव्य आंदोलन झालं नाही.छोट्या छोट्या गटांनी काही मोर्चे काढले,काही निवेदने दिली,पण एक प्रचंड लाट उठली नाही.सत्ताधारी आणि प्रशासकीय अधिकारी यांना हादरवणारी जनआंदोलनाची शक्ती येथे दिसून आली नाही.गट-तटांच्या राजकारणात सामान्य नागरिक अडकले आणि पाणीप्रश्र्नावर एकसंघ लढा दिलाच गेला नाही.

उद्योगधंदेही फिरले माघारी.? पाणीपुरवठ्याच्या समस्येमुळे या शहरात उद्योगधंदे येण्यासही घाबरतात.पुणे,मुंबई,नाशिकसारख्या शहरात रोज पाणी मिळतं,म्हणून तिथे उद्योग फोफावतात. संभाजीनगरला मात्र दहा दिवसांनीही पाणी मिळेल की नाही,याची शाश्र्वती नाही.त्यामुळे शहराचा आर्थिक विकासही खुंटला आहे.आता हे पुरे झालं पाहिजे.धरण तुडुंब भरलेलं असताना घसा कोरडा का राहावा? ही परिस्थिती म्हणजे सत्ताधाऱ्यांचा निष्काळजीपणाचा,भ्रष्टाचाराचा आणि नागरिकांच्या जीवनाशी खेळण्याचा थेट पुरावा आहे.आता केवळ घोषणांनी भागणार नाही. शहरासाठी दररोज पाणी पुरवणं हे सत्ताधाऱ्यांचं कर्तव्य आहे, कृपादान नव्हे! समांतर जलवाहिनीचं काम तातडीने पूर्ण व्हावं. पाणी व्यवस्थापनात पारदर्शकता यावी.टँकर माफियांवर तात्काळ कारवाई व्हावी.आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, नागरिकांनी आता भाबडी आशा सोडून,एका भव्य,ठोस,एकसंघ आंदोलनासाठी सज्ज व्हावं.सत्ताधाऱ्यांना आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या खुर्चीवरून हलवायचं असेल, तर आंदोलनाच्या भीषण आवाजानेच हलवता येईल.आज जर आपण झोपी गेलो, तर उद्या पिण्याच्या पाण्यासाठीही रांगेत उभं राहावं लागेल! तरीही घसा कोरडाच राहील!

**रतनकुमार साळवे- ९९२३५०२३२०**
**छत्रपती संभाजीनगर**

# राशिभविष्य ३० एप्रिल २०२५

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व

फायदेशीर प्रेरणा मिळेल. सामाजिक मान व प्रतिष्ठा मिळेल. मोठ्या व्यक्तिंच्या सहकार्यामुळे आत्मविश्वास वाढणार आहे. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

वृषभ : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पश्चिम

पैशाचे सर्व मार्ग मोकळे होतील. कामाची, व्यवसाची गतीत वाढ होईल. जीवनसाथीशी भावनिक समस्या निर्माण होतील. शासनाचे पूर्ण सहकार्य मिळेल. प्रवास आनंदी राहील.

मिथुन : शुभ रंग : केसरी,शुभ दिशा:पूर्व

वादविवादाचा निपटारा करण्याची वेळ येईल. त्यात आपणास यश मिळेल. खर्च कमी करण्याकडे लक्ष द्या.व्यापारात अचानक लाभ होईल.

कर्क : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा:पूर्व

शत्रुवर विजय मिळवाल. भावनेच्या भरात कोणताही निर्णय घेऊ नका, नुकसान होईल. व्यापारामुळे केलेला प्रवास सुखकारक राहील. मुलांच्या रोजगाराची चिंता समाप्त होईल.

सिंह : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा:पूर्व

व्यापार व्यवसाय फायदेशीर राहील. धैर्य व संयमाने परिस्थिती संभाळून घ्या. आप्तजनांकडून मिळालेल्या सहकार्यामुळे प्रसन्नता राहील. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

कन्या : शुभ रंग : निळा, शुभ दिशा:दक्षिण

आर्थिक कामात अडचणी येण्याच्या शक्यता आहे. कर्मचाऱ्यांवर विश्वास न ठेवता आपले व्यवहार स्वत: पूर्ण करा. अनावश्यक कामासाठी आपला वेळ वाया घालवू नका. पत्नी बरोबर असलेल्या संबंधात सुधारणा होईल.

तुळ : शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा: दक्षिण

आपल्या योजना कार्यान्वयित होईल. जमीन, वहान, मशीनरी यामधील व्यवहार फायदेशीर राहतील. शाररिक थकवा जाणवेल. कुटुंबात शुभ कार्याची चर्चा होईल.

वृश्चिक :शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा:पश्चिम

स्पष्ट बोलण्यामुळे आपण अडचणीत येण्याचा योग आहे. असफलतेमुळे आपल्या नैराश्यमय विचारात वाढ होईल. व्यापारीक निर्णयामुळे नुकसान होईल.

धनु: शुभ रंग : लाल, शुभ दिशा:पश्चिम

आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. शैक्षणिक स्पर्धेमध्ये आपला यश मिळेल. रागावर नियंत्रण ठेवा. घरातील वाद विवाद संपुष्टात येतील.

मकर: शुभ रंग: केसरी, शुभ दिशा:पूर्व

आपल्या कामात अधिक परिश्रम करावे लागतील. कौटुंबिक सुखाचा अभाव राहील. सामाजिक कार्यात भाग घ्याल. व्यापार नौकरीमध्ये अनकुल स्थिती राहील.

कुंभ : शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा:पूर्व

नवीन ओळखीचा आपल्याला भविष्यात फायदा होईल. आळस करू नका. व्यवसायिक प्रतियोगितेत सफलता मिळेल. परमेश्वरा विषयी आस्था वाढेल.

मीन : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा:दक्षिण

आर्थिक गुंतवणूक फायदेशीर राहील. चिंतनाद्वारे केलेले काम आपल्या यशात भर टाकील. महत्वपूर्ण कामामुळे फायदा होईल. कोणाचाही द्वेष अथवा निंदा करू नका.

# इतिहासात आजचा दिवस ३० एप्रिल २०२५

अंतरराष्ट्रीय

१९४५ – ॲडॉल्फ हिटलरची आत्महत्या.

२००६ – चीनमध्ये कोळसा खाणीतील स्फोटात २४ कामगार ठार झाले.

२००६ – नेपाळी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते गिरीज प्रसाद कोईराला यांनी नेपाळचे पंतप्रधान म्हणून पाचव्यांदा शपथ घेतली.

२००७ – अमेरिकेच्या कंसास सिटीत एका बंदुकधाऱ्याने अंधाधुंध गोळीबार करुन चार जणांना ठार केले.

२००७ – ब्रिटनच्या एका नेत्रहीन वैमानिकाने म इक्रोलाइट विमानाने अर्ध्या जगाची सफर करुन नवीन विक्रम प्रस्तापित केला.

२००७ – ट्रॅजेडी किंग दिलीपकुमार यांना भारतीय चित्रपटाचे जनक दादासाहेब फाळके यांच्या १३८ व्या जयंतीदिनानिमित्त एका समारंभात ‘फाळके रत्न’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

२००७ – सरेने ग्लूसेस्टरशायर विरुद्ध एक दिवसीय सामन्यामध्ये ओवल मैदानावर निर्धारित ५० षटकांत चार गडी बाद ४९६ धावा बनवून सर्वोच्च धावसंख्येचा जागतिक विक्रम केला.

राष्ट्रीय

१९३६ – सेवाग्राम आश्रमाची सुरुवात.

२००७ – मानवी तस्करी प्रकरणातील आरोपी व निलंबित भाजपा खासदार बाबूभाई कटारा यांच्याकडे चौकशीनंतर ३५ पासपोर्ट जप्त करण्यात आले.

२००८ – हलके व चालक विरहीत महत्त्वकांक्षी ’लक्ष्य’ या एअरक्राफ्टची चंदीपूर येथे घेतलेली उड्डाण चाचणी यशस्वी झाली.

२००८ – सुप्रसिद्ध गायक महेंद्र कपूर यांना दादासाहेब फाळके अकादमीच्या गोल्डन वॉयस पुरस्काराने गौरविण्यात आले.

जन्म

१८७० – धुंडिराज गोविंद तथा दादासाहेब फाळकेयांचा जन्म.

निधन

१९१३ – व्याकरणकार मोरो केशव दामले यांचे निधन.

२००३ – लेखक वसंत पोतदार यांचे निधन.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894